## ‘मेट्रो ३’ची धाव आता नेव्ही नगरपासून

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेचा कफ परेडपासून नेव्ही नगरपर्यंत विस्तार करण्याची मागणी नौदलाकडून करण्यात आली होती. ही मागणी अखेर मान्य झाली असून मेट्रो ३ यापुढे नेव्ही नगरपर्यंत धावणार आहे. अडीच किमीचे विस्तारीकरण होणार आहे. **वृत्त...३**

# ‘मेट्रो ३’ची धाव आता नेव्ही नगरपासून

## नौदलाची मागणी अखेर मान्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेचा कफ परेडपासून नेव्ही नगरपर्यंत विस्तार करण्याची मागणी नौदलाकडून करण्यात आली होती. ही मागणी अखेर मान्य झाली असून मेट्रो ३ यापुढे नेव्ही नगरपर्यंत धावणार आहे. अडीच किमीचे विस्तारीकरण होणार असून त्यासाठी २५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

भुयारी मेट्रोचे ३२.५ किमी मार्गाचे काम एमएमआरसीकडून सुरू आहे. मात्र कारशेडचा प्रश्न अद्याप निकाली निकाली निघालेला नाही. असे असताना आता या मार्गावरील कफ परेड ते नेव्ही नगर असा अडीच किमीने विस्तार होणार आहे. २०२२-२३च्या अर्थसंकल्पात मेट्रो ३च्या विस्तारीकरणाची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार आता लवकरच या निर्णयाची अंमलबजावणी एमएमआरसीकडून केली जाणार आहे. एमएमआरसीतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार नौदलाने कफ परेड ते नेव्ही नगर असा मेट्रो ३चा विस्तार करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली होती. केंद्राने या मागणीचा विचार करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आणि राज्य सरकारने ही मागणी मान्य करून अखेर नेव्ही नगरपर्यंत मेट्रो ३ नेण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या नेव्ही नगरला जाण्यासाठी बेस्टशिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कोणताही पर्याय उपलब्ध नाही. अशा वेळी मेट्रो नेव्ही नगरपर्यंत नेता येईल असे म्हणत नौदलाने ही मागणी केली होती.

कफ परेड ते नेव्ही नगर असे अडीच किमीचे विस्तारीकरण होणार आहे. पण प्रत्यक्षात पाच किमीचे (येणारी-जाणारी मार्गिका) भुयारीकरण करावे लागणार आहे. त्यासाठी अंदाजे २५०० कोटी रुपयांचा खर्च होण्याची शक्यता आहे. अर्थसंकल्पात विस्तारीकरणाची घोषणा झाली असली तरी राज्य सरकारच्या निर्देशानुसार एमएमओपीएलने यापूर्वीच विस्तारीकरणाचा व्यवहार्यता अभ्यास पूर्ण केला आहे. त्यानुसार हा प्रकल्प व्यवहार्य ठरल्यामुळे आता लवकरच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करून बृहत् आराखडा तयार करण्यात येईल. हा आराखडा मंजूर झाल्यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण करून कामाला सुरुवात करण्यात येईल. ही प्रक्रिया बरीच मोठी असल्याने काम सुरू होण्यास आणखी बराच काळ लागणार आहे.